# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३१/०५/२०२५ (शनिवार)

---

**सट्टापट्टीचा जुगार चालविणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील संघटीत गुन्हेगारी च्या कलमान्वये गुन्हा नोंद, २ आरोपी अटक, खापरखेडा पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक २८/०५/२०२५ रोजी आरोपी छोटु गोपाल करसयाल, वय ३४ वर्षे ,रा. न्यु नांदा कोराडी हा सार्वजनिक ठिकाणी मौजा नांदा शिवार येथे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहताना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातुन १) सट्टापट्टीचे वेगवेगळे आकडे मराठीत लिहलेले आणि रोख रक्कम ६३५/—रू, असा चा मुदेमाल माल जप्त केला. नमुद आरोपीला सट्टापट्टी बाबत अधिक विचारपुस केली असता आरोपी ने बंटी स्वामी, रा. कोराडी यांचे सांगण्यावरून ३००/—रू रोजीने सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगाराचा धंदा चालवत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. सदर प्रकरणी नमुद दोन्ही आरोपी विरूध्द पो.स्टे. अप क्र. ४०१/२०२५ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सहकलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

**यातील आरोपी नामे १) छोटु गोपाल करसयाल, वय ३४ वर्षे ,रा. न्यु नांदा कोराडी व आरोपी क्र. २) मुत्थु उर्फ बंटी राजेंद्र स्वामी, वय ४९ वर्ष, रा. फुलेनगर महादुला कोराडी, ता. कामठी जि. नागपूर हे दोघे मिळुन अवैध्यरित्या सट्टापट्टीचा जुगारचा धंदा चलवितात. तसेच आरोपीक्र. २ हा इतर गुन्हेगारी आरोपी सोबत मिळुन अश्याच प्रकारचे गुन्हे करतो या वरून नमुद आरोपी किरकोळ संघटीत गुन्हेगारी करीत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात पोलीसांनी कलम ११२ भा.न्या.सं. २०२३ अन्वये कलम वाढ करून दोन्ही आरोपीतांना अटक करून मा न्यायलयासमक्ष हजर केले असता मा.न्यायालयाने नमुद दोन्ही आरोपीतांचा दिनांक ०१/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
## १ कोटी ११ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त
## मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या विशेष पथकाची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नगर असुन वेळोवेळी ते अवैध धंदयावर कारवाई कामी विशेष पथक तयार करून कारवाई चे आदेश देतात. दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मनसर कडुन कन्हान मार्गे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पथकाने पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत कन्हान हायवे रोडवर कुंभलकर धाब्याजवळ नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई कं १ :—** नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन १६ चक्का ट्रक कमांक एम. एच. ३४ बी. झेड. २००४ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **अक्षय सुरेश पाटील, वय ३३ वर्षे , रा. कोराडी** जि. नागपुर अशी माहीती प्राप्त झाली. त्याला रेती वाहतुक परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता. सदर वाहन मालकाचे नाव **अमर लांजेवार, रा. मनकापुर ,नागपुर** असे असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये आणि २) १६ चक्का ट्रक कमांक एम.एच. ३४ बी. झेड २००४ किंमती ५५,००,०००/—रूपये असा एकुण **५५,६०,०००/— रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

**कारवाई कं २ :—** नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन संशयीत वाहन १२ चक्का ट्रक कमांक एम एच ४० बी.एफ ९०८७ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **रविंद्र रामा भलावी, वय ३५ वर्षे , रा. रेटी,खवासा,ता कुरई जि. सिवणी** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. **वाहन मालकाचे नाव रोशन मणिराम कोडवते, रा. वडंबी, देवलापार असे** असल्याची माहीती प्राप्त

झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १०  ब्रास रेती किंमती ५०,०००/रूपये आणि २) ट्रक क्रमांक एम एच ४० बी.एफ ९०८७ किंमती ५५,००,०००/—रूपये  असा एकुण ५५,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**सदर कारवाईत दोन वाहनासह २२ ब्रास रेती असा एकुण १,११,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे. **नमुद गुन्हयातील दोन्ही चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



# अल्पवयीन बालिकेसोबत लैगिंक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२७/२३ कलम ३७६(अ,ब),३७६(३),४५२,५०६ भादवी सहक. ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

नमुद गुन्हयातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही तिच्या घरात एकटी असल्याचे पाहुन यातील आरोपी नामे **सचिन नामदेव कुकडे, वय ३९ वर्षे ,रा. टिचर कॉलनी हिंगणघाट ह.मु. रा. बोरखेडी फाटा , बुटीबोरी** याने फिर्यादीच्या घरात जावुन जबरदस्तीने अल्पवयीन पिडीतेवर लैगिंक अत्याचार केला तसेच सदर घटनेबाबत कुणालाही सांगीतले तर पिडीतेला मारण्याची धमकी दिली, अशा फिर्यादिच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणाचे सखोल तपास करून उपविभागिय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्र ६ श्रीमती एच.सी. शेंडे यांनी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी आरोपी नामे सचिन नामदेव कुकडे, वय ३९ वर्षे ,रा. टिचर कॉलनी हिंगणघाट ह.मु. रा. बोरखेडी फाटा , बोरी याला १) **कलम ३७६(अ,ब), ५११ भादवी मध्ये १२ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रूपये दंड ,दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास २) कलम ४५२ भादवी मध्ये ७ वर्षे सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड ,दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास ३) कलम ३७६ (३), ५११ भादवी सहक. ४,६,१८ पोक्सो मध्ये १२ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू. दंड ,दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास, अशी शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे.** सरकारचे वतीने एपीपी श्रीमती दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ अनिल व्यवहारे पो.स्टे.बुट्टीबोरी यांनी मदत केली आहे.

## पोस्टे बोरी हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, नागपुर विभाग यांची कारवाई

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मौजा बुटीबोरी शिवमंदिर मागे बाजार चौक बोरी येथे एक इसम सट्टापट्टीचे आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन टाईम बाजार नावाचा हारजितचा जुगार खेळवीत आहे. श्री दिपक अग्रवाल यांनी उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, नागपुर विभाग आणि पोलीस स्टेशन बोरी येथील अधिकारी आणि अंमलदाराचे पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्याप्रमाणे पोलीस पथक सापळा रचुन घटनास्थळी गेले असता आरोपी नामे १) रविंद्र गुलाब चितराम, वय ५२ वर्ष,रा बुटीबोरी हा सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता सदर सट्टापट्टीचे आकडे तो आरोपी क्रं २) विनोद भगवान नागदेवे, वय ४० वर्षे, ३) किशोर मस्के, ४) कुदरत अली सैयद सर्व रा बुटीबोरी यांच्या सांगण्यावरून घेत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली . आरोपी नामे रविंद्र गुलाब चितराम, वय ५२ वर्षे,रा बुटीबोरी यांच्या ताब्यातुन, सट्टापट्टीचे सहीत्य, रोख रक्कम ६७०/— रूपये, कॅलक्युलेटर, दोन ॲड्रॉईड मोबाईल आणि इतर साहीत्य **असा एकुण किंमती १२,६७०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपतांविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम सह कलम ४९ भा.न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक ३०/०५/२०२५** रोजी पोलीसांनी गुप्तबातमीदाराच्या महीतीच्या आधारे पेट्रोलींग करून अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** :— मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्र. १ नामे विशाल शिवशंकर धांडे, वय ४५वर्षे, रा. वार्ड नं. ०६ ,गोपाल चौक, मौदा ता. मौदा हा तिघरे ले आउट, स्नेहनगर मौदा येथे आणि आणि आरोपी क्रं २) हरिष ज्ञानेश्वर आपतुरकर, वय ३२ वर्ष,रा. प्लाट नं.३२ श्विनगर, भंडारा रोड, मौदा हा मटन मार्केट मौदा येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन कन्हान:—** कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) नामे आशिष विजयसिंग ठाकूर, वय २७ वर्ष ,रा. शंकरनगर, कन्हान हा आंबेडकर चौक येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं २) जमीर उर्फ जानु समीर सद्दीकी, वय ३७ वर्षे,रा धरमनगर, कन्हान आणि आरोपी क्रं ३) अजय सराटकर वय,३४ वर्ष रा.हनुमान नगर, कन्हान हे पंजाब नॅशनल बॅक, कन्हान जवळ अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** खापरखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे मोहम्मद तबरेज मोहम्मद सगीर शेख राईन, वय २८ वर्षे ,रा. वार्ड नं ०३ चनकापुर, ता. सावनेर जि नागपुर हा मौजा चनकापुर आठवडी बाजार येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे केशव मधुकरराव वालूकर, वय ५२ वर्षे, रा. गणेशपूर ता.वरुड जि. अमरावती हा मौजा मोवाड येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत वर नमुद अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या ७ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने